# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर

(सचिवालय)

## नोटीस

नागपूर महानगरपालिकेची विशेष सभा गुरुवार दिनांक १२/०३/२०२० रोजी सकाळी ११.०० वाजता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील अनुसूची (ड) प्रकरण २ कलम १ (ड) अन्वये स्थायी समितीच्या सदस्यांनी सहया करुन लेखी मागणी केल्यावर खालील विषयावर श्रीमंत राजे रघुजीराव भोसले, नगरभवन, महाल येथे विचार करण्याकरिता भरणार आहे.

नागपूर
दिनांक :- ०४/०३/२०२०

आदेशान्वये,

हस्ता/-
(राजेश म मोहिते)
निगम सचिव (प्र) तथा उपायुक्त
महानगरपालिका, नागपूर

**वि.क्र.७३** :- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ९५ अन्वये आयुक्ताने दरवर्षी, महानगरपालिका वेळोवेळी विहीत करील अशा तारखेस किंवा अशा तारखेपूर्वी, स्थायी समिती मान्य करेल अशा नमुन्यात, स्थायी समितीस सादर करावयाचे आहे. नागपूर महानगरपालिकेने ठराव क्र. ५५ दिनांक १५-०२-२०१३ अन्वये अशी तारीख निश्चित करुन दिलेली आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ९६ अन्वये स्थायी समितीस दरवर्षी आपले अर्थसंकल्पीय अंदाज पत्रक सादर करण्याची तरतूद आहे. तसेच कलम ९६ (४) च्या तरतूदीच्या अनुषंगाने स्थायी समितीस आपले अंदाज पत्रक सादर करते आणि तसेच अधिनियमातील कलम १०० अन्वये महानगरपालिकेसमक्ष अंतिम मंजूरी करिता दिनांक ३१ मार्च पूर्वी सादर करण्याची तरतूद आहे.

आयुक्त, महानगरपालिका, नागपूर यांनी आज पावेतो स्थायी समितीस आपले अर्थसंकल्पीय अंदाज पत्रक सन २०२०-२०२१, कलम ९५ अन्वये सादर न केल्यामुळे स्थायी समिती अधिनियमातील आपले कर्तव्ये निर्धारित वेळेत पार पाडण्यास असमर्थ असण्याची शक्यता आहे. या बाबत चर्चा करुन योग्य निर्णय घेण्यास्तव.

टिप :- मा. महापौरजी यांना स्थायी समिती सदस्यांनी विशेष सभेकरिता सादर केलेले लेखी मागणी पत्र नस्तीत सलग्न.

———————————————